**महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियान**

**जिल्हा अभियान कक्ष, जालना**

**2 रा मजला, जिल्हा परिषद, जालना (02482-225510)**

जा.क्र./MSRLM/PRINTING RC/3954 /2020 दिनांक 17 / 06/2020

**दरपत्रक विनंतीपत्र**

**प्रती,**

------------------------------

------------------------------

------------------------------

विषय - महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियान जालना अंतर्गत स्टेशनरी खरेदी व छपाई करणे बाबत.

माननीय महोदय,

1. ग्रामिण भागातील दारिद्र निर्मुलन करण्यासाठी केंद्रशासनाने ग्रामविकास मंत्रालयाच्या माध्यमातुन व जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने दिनदयाळ अंतोदय योजना (राष्ट्रीय ग्रामिण जीवनोन्नती अभियानाची) सुरुवात केली आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी राज्यात उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियानाची स्थापना करण्यात आलेली आहे. या अभियानाची अंमलबजावणी जिल्हा स्तरावर जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात येते.

2. सन 2020-21 या कालावधीसाठी जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष जालना व अंतर्गत भोकरदन, जालना, घनसावंगी, बदनापुर, मंठा, अंबड, जाफ्राबाद व परतुर येथे अभियानाचे काम करण्यासाठी खालील स्टेशनरी खरेदी / छपाई करीता दरकरार करणेसाठी दर मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | विवरण | तपशिल | नग | पुरवठा करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | कॅशबुक | 25 x 38 CM Size, Back To Back 200 Page | 12 | महाराष्ट्र राज्य जिवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, 2 रा मजला, जिल्हा परिषद, जालना |
| 2 | लेजर बुक | A4 Size, Back To Back 200 Page | 12 | |
| 3 | टिपणी पेज | 21 x 34 CM | 10000 | |
| 4 | फाईल कव्हर | 25 x 35 CM Size With Printing | 1800 | |
| 5 | आवक रजिस्टर | 500 Pages | 12 | |
| 6 | जावक रजिस्टर | 500 Pages | 12 | |
| 7 | हजेरी रजिस्टर | 200 Pages | 24 | |

*उपरोक्त दिलेली संख्या ही अंदाजित असुन त्याचा मुल्यमापनासाठी विचार करण्यात येईल तसेच त्यामध्ये प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना बदल होऊ शकतो. तसेच आवश्यकते नुसार वेळोवेळी करार कालावधीमध्ये पुरवठा आदेश देण्यात येईल.

3. **दरपत्रक सादर करताना सोबत जोडावयाची प्रमाणपत्रे**

A) PAN CARD जोडावे, B) SHOP & ESTABLISHMENT ACT अंतर्गत नोंदणीकृत प्रमाणपत्र किंवा इतर सक्षम प्राधिकरण अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र जोडावे C) असल्यास GOODS & SERVICE TAX REGISTRATION प्रमाणपत्र जोडावे.

4. **बोलीचे/निविदा/देऊ केलेलेमूल्य** (Bid Price)

अ) पुरवठादाराने अदा करावयाचे सर्व शुल्क, कर व अन्य उपकर दरामध्ये समाविष्ट करावेत.

आ) प्रत्येक बाबीसाठी देऊ केलेले दर हे कंत्राटाच्या कालावधीसाठी कायम राहतील व ते सामायोजनास पात्र असणार नाहीत.

इ) एखाद्या बाबीच्या अंशतः परिमाणासाठी देऊ केलेले दर ग्राह्य असणार नाहीत

ई) दुरुस्ती असल्यास त्यावर काट मारून, छोटी स्वाक्षरी करून तारीख लिहून पुन्हा योग्य असेल ते लिहावे.

5. प्रत्येक पुरवठादाराने फक्त एकच दरपत्रक सादर करावे.
6. दरपत्रकाची वैधता : दरपत्रक सादर करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या शेवटच्या तारखे पासून 45 दिवसांपेक्षा कमी नसलेल्या कालावधीसाठी दरपत्रक वैध राहील.
7. **दरपत्रकांचे मूल्यमापन** : सर्व दरपत्रकांचे मूल्यमापन व तुलना करून ठोस प्रतिसाद देणाऱ्या म्हणजेच व्यवस्थित स्वाक्षरीत असलेल्या व नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींशी अभिसंगत असणाऱ्या दरपत्रकांचे **सर्व बाबींचे मिळून** मूल्यमापन केले जाईल.
8. निवड झालेल्या पुरवठादारास रु. 100/- च्या मुद्राक शुल्क (Bond Paper) वर करार करुन दयावा लागेल त्याचा खर्च पुरवठादारास करावा लागेल.
9. **करार कालावधी** : करार सुरुवातीला एक वर्षाच्या कालावधीसाठी असेल. काम समाधानकारक असल्याचे आढळल्यास दरांमध्ये कुठलेही बदल न करता सहा महिन्यार्पंत वाढविण्यात येईल.
10. पुरवठा कंत्राट आदेशबहाल करणे : ज्याची दरपत्रक प्रतिसादी स्वरुपाची ठरविली आहे व किमान मूल्याचा देकार दिला आहे अशा सेवा पुरवठादारा सोबत करार केला जाईल.
11. करार बहाल करताना मूल्यामध्ये कोणताही बदल न करता परिमाणामध्ये आवश्यकतेनुसार वाढ किंवा घट करण्याचा अधिकार खरेदीदार राखून ठेवीत आहेत.
12. पुरवठा केल्यावर व त्याचा स्वीकार केल्यानंतर देयक अदा केले जाईल.
13. वर जरी काहीही म्हटले असले, तरीसुद्धा कोणतेहीदरपत्रक स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे, खरेदीप्रक्रिया रद्दकरण्याचे व कंत्राट बहाल करण्याआधी सर्व दरपत्रक फेटाळण्याचे अधिकार खरेदीदार राखून ठेवीत आहेत.
14. स्टेशनरी खरेदी / छपाई करीता दरपत्रक असे शिरोरेखीत लिहिलेल्या सीलबंद लिफाफ्यामध्ये विहित नमुन्यातील दरपत्रक दि. / / 2020 रोजीच्या दुपारी 1:30 वाजेपर्यंत महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान कक्ष, 2 रा मजला, जिल्हा परिषद जालना, येथे सादर करावयात.
15. पुरवठादारांच्या प्रतिनिधींच्या समक्ष दि. / /2020 रोजी दुपारी 3:30 वाजता दरपत्रक महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान कक्ष, 2 रा मजला, जिल्हा परिषद जालना, येथे खुल्या केल्या जातील.
16. दरपत्रक सादर करण्यासाठीच्या निर्धारित कालमर्यादेनंतर प्राप्त झालेल्या सर्व दरपत्रक फेटाळल्या जातील व त्या खुल्या न करताच पुरवठादारांना परत केल्या जातील.

आपण दरपत्रक सादर कराल असा विश्वास व्यक्त करून ह्या प्रकल्पामध्ये आपण दाखविलेल्या उत्सुकतेबद्दल आपले आभारी आहोत.

जिल्हा अभियान संचालक
जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनन्नोती अभियान
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

दरपत्रकचा नमुना (पुरवठादाराच्या लेटरहेड वर, उपलब्ध नसल्यास पुरवठादाराचा शिक्का)

दिनांक 17 / 06 /2020

प्रती,
जिल्हा अभियान संचालक
जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनन्नोती अभियान
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, जालना.

विषय : महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियान जालना अंतर्गत स्टेशनरी खरेदी व छपाई करण्यासाठी दरपत्रक सादर करण्याबाबत.

संदर्भ : आपले दिनांक / /2020 चे दरपत्रक सादर करण्याबाबतचे विनंती पत्र.

माननीय महोदय,

आपल्या गरजेनुसार अतिशय रास्त व स्पर्धात्मक दर असलेली दरपत्रक सादर करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे :

| अ.क्र | विवरण | विनिर्दिष्ट तपशील | एकक | परिमाण/ संख्या | नगाचा दर रुपयामध्ये | एकूण रक्कम रुपया मध्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कॅशबुक | 25 x 38 CM Size, Back To Back 200 Page | नग | 12 | | |
| 2 | लेजर बुक | A4 Size, Back To Back 200 Page | नग | 12 | | |
| 3 | टिपणी पेज | 21 x 34 CM | नग | 10000 | | |
| 4 | फाईल कव्हर | 25 x 35 CM Size With Printing | नग | 1800 | | |
| 5 | आवक रजिस्टर | 500 Pages | नग | 12 | | |
| 6 | जावक रजिस्टर | 500 Pages | नग | 12 | | |
| 7 | हजेरी रजिस्टर | 200 Pages | नग | 24 | | |
| | एकूण | | | | | |
| | वस्तु आणि सेवा कर | | | | | |
| | एकूण ठोक मूल्य : रु | | | | | |

वरील नमूद वस्तू दरपत्रकसाठीच्या विनंतीमधील तांत्रिक विनिर्दिष्टाला अनुसरून व इतर अटी व शर्ती नुसार एकूण कंत्राट मूल्य रु ________ (आकड्यांमध्ये) रुपये ________________ (शब्दांमध्ये) मध्ये नमूद केलेल्या कालावधीत सेवा पुरविण्यास आम्ही तयार आहोत. फॉर्म / प्रपत्र निहाय स्टॅपल करुन पुरवठा करण्यात येईल.

आम्ही असे प्रमाणित करतो की आम्ही किंवा आमच्या वतीने कोणीही व्यक्ती लाचलुचपत करणार नाही याची आम्ही काळजी घेतली आहे.

सेवा पुरवठादाराची शिक्क्यासहित स्वाक्षरी